## सर्व शिक्षा अभियान

# नाविण्यपूर्ण उपक्रम



सर्व शिक्षा अभियान अंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रम यात चार मुख्य उपक्रम अंतर्भूत आहेत -

A) बालशिक्षण व संगोपन,
B) मुलींचे शिक्षण,
C) अनुसूचित जाती-जमातीच्या समुदायातील मुलांसाठी शिक्षण,
D) उच्च प्राथमिक वर्गातील मुलांना संगणक प्रशिक्षण.

### A) बालशिक्षण व संगोपन :-

- एकात्मिक बालविकास प्रकल्पाखाली सुरु असलेल्या अंगणवाडया व जिल्हा परिषदेच्या बालवाडयाचे सबलीकरण,
- बालवाडया अथवा अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देणे,
- बालवाडीकरिता साहित्य पुरविणे,
- शाळापूर्व शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी जनजागृती करणे,
- बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण यांची सांगड घालणे.

### B)मुलींचे शिक्षण :-

- शिक्षणाच्या प्रवाहात मुलींना आणण्यासाठी विशेष पटनोंदणी मोहीम आयोजित करणे,
- मुलींच्या शाळेतील नियमित उपस्थितीचे महत्त्व पालकांना समजून देणे,
- गळती झालेल्या मुलींना शाळेत दाखल करण्यासाठी पाठपुरावा करणे,
- मुलींच्या शिक्षणातील समस्या सोडविण्यासाठी महिला गट, ग्राम शिक्षण समिती, माता-पालक संघ यांचा समावेश करुन घेणे,
- स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य बिंबविण्यासाठी मुलींच्या शिक्षणाला विशेष गती देण्याकरिता विशेष कार्यक्रमांचे आयोजन करणे,
- ज्या मुलींनी किशोरी अवस्थेत शाळा सोडली आहे त्यांना परत शाळेत आणण्याकरिता किशोरी शिबिरांचे आयोजन करणे,
- जीवन कौशल्य शिक्षणावर आधारित खास व्यवसाय प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करणे.

## C)अनुसूचित जाती-जमातीच्या समुदायातील मुलांसाठी शिक्षण :-

- ◎ या जाती-जमातीच्या कुटुंबातील मुलांच्या विशेष गरजांनुसार त्यांना विशेष अध्याप-नाची सोय उपलब्ध करणे,
- ◎ मुलांना शाळेत पाठविण्यास पालकांना प्रवृत्त करण्यासाठी समुपदेशन कार्यक्रम आयोजित करणे,
- ◎ दुर्बल घटकातील मुलांची उपस्थिती टिकविण्यासाठी पाठपुरावा व उपक्रमांचे आयोजन करणे,
- ◎ स्थानिक गरजांुसार आवश्यक वैशिष्टयपूर्ण उपक्रमांची तरतूद,
- ◎ अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना ग्रामशिक्षण / प्रभाग (वार्ड) शिक्षण समित्या आपल्या आहेत याची जाणीव करुन देणे,
- ◎ इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा व इतर स्पर्धात्मक परीक्षांची विशेष तयारी करुन घेणे,
- ◎ व्यवसाय मार्गदर्शन करणे.

## D)उच्च प्राथमिक वर्गातील मुलांनाा संगणक प्रशिक्षण :-

- ◎ संगणक प्रयोगशाळांची निर्मिती करण्यासाठी जास्त पट/उपस्थिती असणा-या उच्च प्राथमिक शाळांची निवड करणे,
- ◎ प्रयोगशाळांसाठी संगणकांची खरेदी करणे,
- ◎ संगणकांचे प्रशिक्षण उच्च प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना देणे,
- ◎ संगणक पुरविलेल्या शाळांना, संगणक शैक्षणिक प्रणालीचा पुरवठा करणे,
- ◎ संगणक प्रयोगशाळा तयार करण्यासाठी नगरपालिका / महानगरपालिका व जिल्हा परिषदांच्या शाळांना तरतूद उपलब्ध करुन देणे.